श्री तलवारे ग्राहक प्रतिनिधी यांनी मंचासमोर असे सांगितले की, आम्ही मार्च १६ पर्यतची सर्व बिले भरली आहेत.तसेच आम्ही वेळेवर बिले भरणारे ग्राहक आहोत.दिनांक २०.०४.२०१६ रोजी फिरते पथक उस्मानाबाद यांनी सदर ग्राहकाची स्थळ तपासणी करुन Meter Display बंद असल्याचे आम्हाला कळवले व त्यानुसार एप्रील २०१५ ते मार्च २०१६ पर्यतचे प्रति दिवस १२० युनीट नुसार एकवर्षासाठीचे ४३२०० units चे बिल दिले. परंतु आम्ही सदर कालावधीतील बिले रिडींग नुसार भरलेले असल्याने १५२५३ unit वजा करुन रु.४४२१६१.६०इतक्या रकमेचे बिल एप्रील १६ च्या बिला मध्ये दाखवले.सदर चे assessment कमी करण्यासाठी आम्ही o&m वाशी उपविभागाकडे तगादा लगावला असता त्यांनी flying squad उस्मानाबाद कडे जाऊन बिल कमी करण्यास सांगितले सदर ची बाब जबाबदारी टाळण्याची आहे.

महावितरण तर्फे दिनांक २०.०९.२०१६ रोजी आमचा विद्युत पुरवठा कायम स्वरुपी बंद करण्यात आल्याचे कथन केले. त्याच बरोबर त्यांनी असाही जवाब दिला की या ठिकाणी Electricity Act 2003 Sec-56(1) नुसार १५ दिवसाची नोटीस देण्याचे बधंनकारक होते. तसे महावितरणे केले नाही. दिनांक २०.१०.२०१६ चे विनंती नुसार मे १६ ते ऑगष्ट १६ पर्यतचे चालु बिल भरुन घेवुन आमचा विद्युत पुरवठा २५.१०.२०१६ रोजी चालु केला. त्याच बरोबर २२.१२.२०१६ रोजी आम्ही करंट बिल भरले आहे. त्यानुसार आमचा विद्युत पुरवठा जानेवारी १७ पर्यंत चालु होता. त्यानंतर तो दिनांक ०३.०२.२०१७ रोजी विद्युत पुरवठा कायम स्वरुपी बंद केला आहे. यावरुन महावितरण ने Electricity Act 2003 Sec-56(1) व Condition of supply 17.3 चे पालन केले नाही. बिल वेळेवर भरणा करणाऱ्या ग्राहकाचा विद्युत पुरवठा खंडीत करुन ग्राहकाला अडचणित आणुन ग्राहकाचे नुकसान केलेले आहे. विद्युत Meter चा display हा battry discharge झाल्यामुळे त्यांना दिसला नसावा आणि वर्षभर विद्युत देयेके ही meter च्या रीडींगप्रमाणे आलेली होती व ती आम्ही भरलेली आहेत. असे असतानाही assessment करणे चुकीचे आहे आणि ते पुर्णपणे withdrawl करण्यात यावे. Flying squad च्या कारवाईनुसार एप्रील १६ मध्ये मीटर बदलला व जानेवारी १७ पर्यंतची मीटरनुसारचे बिले अदा करण्यात आली ते consumption व आत्ताचे consumption हे मिळते जुळते असुन आमच्या वापरा प्रमाणे बरोबर आहे.

ग्राहकप्रतिनिधीनी असे कथन केले की गैरअर्जदाराने meter accuracy test केली नाही. अथवा meter test केला नाही. त्यामुळे Electricity Act 2003 sec55 चे उल्लंघन केले आहे. उपकार्यकारी अभियंता वाशी यांनी भरारी पथक, उस्मानाबाद यांचे आदेशाचे फक्त डोळे बंद करुन पालन केलेले आहे. महावितरणच्या कुठल्याही नियमाचा, परिपत्रकाचा तसेच विद्युत कायद्याचा सदर assessment ला अधार घेतलेला नाही. व मनमानीपणे बिल अदा करुन ग्राहकाचे नुकसानीस कारणीभुत ठरलेले आहेत. तसेच 'आम्ही ऑगष्ट २०१६ मध्ये दिलेल्या बिल दुरूस्तीच्या पत्राचे उपकार्यकारी अभियंता यांनी कसलीच दखल घेतली नाही विज बिल दुरुस्तीची तक्रार ही एक महिण्याच्या आत सोडविणे हे sop नुसार बंधन कारक आहे.sop.6.(i)या कलमाचे सुध्दा उपकार्यकारी अभियंता यांनी उल्लंघन केलेले असल्यामुळे यांच्यावर sop नुसार कारवाई करण्यात यावी व ती भरपाई आम्हाला देण्यात यावी. तसेच विद्युत पुरवठा खंडीत केल्याने आम्हास सदरचे कनेक्शन डिझेल वरती चालु ठेवावे लागले. त्यास आम्हाला रु.१२०१०१ चे डिझेल लागले त्यांचे नुकसान भरपाई आम्हाला देण्यात यावी. विद्युत पुरवठा हा विनानोटीस बंद केल्यामुळे आम्ही IGRC कडे गेलो नाही. तसेच आमच्या मागणीनुसार आम्हास Interim order देण्यात यावी व विद्युत पुरवठा चालु करावा आमची कोणतीही